महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

---

जा.क्र/मऔविम/मुनि/I70520/२०२४ दिनांक:- 12/08/2024

# परिपत्रक

**विषय :-माहिती तंत्रज्ञान भूखंडांबाबत महामंडळाच्या धोरणामध्ये सुधारणा करणेबाबत.**

**संदर्भ :-** महामंडळाचे परिपत्रक क्र. मुनि/P१९७३८२ दि. १५/०३/२०२४.

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील माहिती व तंत्रज्ञान भूखंडाच्या संदर्भात उद्योजकांना येणा-या अडचणी विचारात घेवून सदस्य मंडळाच्या दि. ०६/०३/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ६७९१ नूसार दि. १५/०३/२०२४ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकानूसार महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील माहीती व तंत्रज्ञान भूखंडासाठी विकास कालावधी ईमारतीचे उंची नूसार खालील प्रमाणे निश्चित करण्यात आला आहे.

| अ.क्र. | इमारतीची उंची | विकास कालावधी (वर्ष) |
|---|---|---|
| १. | ३६ मी पर्यंत | ३.० |
| २. | ३६ मी ते ७० मी | ४.० |
| ३. | ७० मी पेक्षा जास्त | ५.० |

सदरचे धोरण दि.१५/०३/२०२४ पासून म्हणजेच परिपत्रक निर्गमित केलेल्या दिनांकापासून लागू करण्यात आले आहे. परंतू, महाराष्ट्र शासनाने माहिती तंत्रज्ञान उद्योगाबाबत दि.२७/०६/२०२३ रोजी माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण -२०२३ जाहीर केले आहे. सदर धोरणाचा समावेश महामंडळाचे CDCPR-२३ मध्ये करण्यात आला आहे. सदर परिपत्रक निर्गमित केल्यापासून नविन IT Policy ची अंमलबजावणी महामंडळाच्या स्तरावर सुरु होती. तथापी यापुर्वी नवीन IT धोरणे आल्यापासून दि. १५/०३/२०२४ च्या परिपत्रक निर्गमित केल्याच्या दरम्यान, जी प्रकरणे मंजूर झालेली आहेत त्यांना दि. १५/०३/२०२४ च्या परिपत्रकाप्रमाणे वाढीव उंचीनुसार मुदवाढीचा लाभ अनुज्ञेय होत नव्हता त्यामुळे सदरची विसंगती दुर करण्यासाठीचा प्रस्ताव मा. सदस्य मंडळाचे दि.२९/०७/२०२४ चे बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाबाबत ठराव क्र. ६८१८ पारित करण्यात आला असून त्यानूसार सदस्य मंडळाच्या दि. ०६/०३/२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ६७९१ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

१. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील IT भुखंडांचा विकास करतांना इमारतीच्या उंचीनुसार भुखंडांच्या विकास कालावधीचे नविन धोरण आहे. सदर धोरण हे औद्योगिक क्षेत्रातील IT Plot, निवासी व वाणिज्य भूखंड यांच्यासाठी देखील लागु राहील.

२. सदरचे धोरण नविन IT Policy प्रमाणे नव्याने मंजूर झालेल्या किंवा सुधारीत नकाशा मंजूरीसाठी प्रस्तावित असलेल्या सर्व प्रकरणाकरीता लागु राहील. तथापी, अश्या प्रकरणामध्ये दि. १५/०३/२०२४ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या कमाल विकास कालावधी मर्यादेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

३. तसेच दि. १५/०३/२०२४ चे परिपत्रकामधील उर्वरित अटी व शर्ती कायम राहतील.

सदर परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

Vaijapurkar

मुख्य नियोजक
मऔविम, मुंबई -९३.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड /छ. संभाजीनगर / नागपूर
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/ पुणे/ छ. संभाजीनगर / नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/ व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१३. सर्व औद्योगिक संघटना.
१४. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यु.टी.सी.), कफ परेड, मुंबई.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in